# २०२४ पर्यंत मेट्रो-३ च्या सर्व ट्रेन ताफ्यात

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३ मार्गाच्या पहिल्या टप्प्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व ट्रेन मुंबईत दाखल होण्यास २०२४ साल उजाडणार आहे. एकूण ३१ पैकी नऊ ट्रेन जून २०२३ साली मेट्रोच्या ताफ्यात येतील. उर्वरित ट्रेन मे २०२४ सालापर्यंत उपलब्ध होतील. या मार्गासाठी पहिली ट्रेन मागील महिन्यात मुंबईत आणण्यात आली. मुंबई मेट्रो-३ ने ३१ ट्रेनची मागणी नोंदवली आहे. या ट्रेनची बांधणी आंध्र प्रदेशातील श्रीसिटी येथे सुरू आहे. मुंबईत आलेल्या पहिल्या ट्रेनची चाचणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडली होती. आता लवकरच दुसरी ट्रेनही दाखल होत आहे. साधारणपणे नोव्हेंबर महिन्यात ट्रेन येईल. मेट्रोचा पहिला टप्पा जून २०२३ मध्ये सुरू करण्याचा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचा इरादा आहे.कारडेपोचे काम प्रगतिपथावर आहे. नऊ ट्रेनच्या चाचण्या घेण्यासाठी तात्पुरती तजवीज करण्यात आली आहे.